निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : ८७ वा
शनिवार -३१ मे २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247




# शेतकऱ्यांच्या सुचनांना प्राधान्य

## - कृषीमंत्री माणिकराव कोकाटे

### गतीशील व प्रयोगशील शेतकऱ्यांशी कृषीमंत्र्यांनी साधला संवाद

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)**

शेती हा व्यवसाय अधिकाधिक किफायतशीर व्हावा. कृषी विभागाचे सर्व निर्णय हे शेतकऱ्यांना मदत करणारे व हिताचे व्हावे. यादृष्टीने शेतकऱ्यांच्या सुचना ऐकून त्यास शासन प्राधान्य देत आहे, असे प्रतिपादन कृषी मंत्री ड. माणिकराव कोकाटे यांनी आज येथे केले.

कृषी विभागाच्या वतीने प्रगतीशील व प्रयोगशील शेतकऱ्यांचा परिसंवाद आयोजीत करण्यात आला होता. जालना रोडवरील शिवनेरी लॉन येथे हा कार्यक्रम पार पडला. छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, नांदेड, लातूर, धाराशिव, हिंगोली या जिल्ह्यातील शेतकरी या परिसंवादात सहभागी झाले होते.

विभागीय कृषी सहसंचालक छत्रपती संभाजीनगर व लातूर यांच्यावतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी कृषीमंत्री ड. कोकाटे हे होते. आ. अनुराधा चव्हाण, कृषी आयुक्त सुरज मांढरे, स्मार्ट चे प्रकल्प संचालक डॉ. हेमंत वसेकर, संचालक आत्मा अशोक किरनळ्ळी , विभागीय कृषी सहसंचालक प्रकाश देशमुख तसेच सर्व जिल्ह्यांचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी तसेच शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




परिसंवादात कापुस, मका, सोयाबीन,फळबाग , संरक्षित शेती, मसाला शेती, शेतकरी गट-उत्पादक कंपनी, अन्न प्रक्रिया उद्योग, शेती पुरक व्यवसाय, नैसर्गिक शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे गट तयार करण्यात आले होते. त्यातील शेतकऱ्यांनी आपल्या गटामार्फत मांडलेल्या सुचना कृषीमंत्र्यांनी ऐकल्या. या सुचनांची नोंद घेण्यात आली.

कोकाटे म्हणाले की, शेतकऱ्यांना प्रत्यक्ष शेती करतांना आलेले अनुभव, विद्यापीठांनी केलेल्या शिफारसी, बाजारपेठ इ. सर्व बाबींचा एकत्रित अभ्यास करणे आवश्यक आहे. त्यासाठी केंद्रशासनाचे कृषी शास्त्रज्ञ व विद्यापीठांचे शास्त्रज्ञ यांचे पथक थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत. शेतकऱ्यांना माती परिक्षण सुविधा अधिक जवळ उपलब्ध व्हावे यासाठीही शासन प्रयत्नशील असून फिरत्या प्रयोगशाळा तयार करण्यात येणार आहेत. शेतकऱ्यांनी उत्पादीत केलेल्या सेंद्रीय शेती मालाच्या विक्रीसाठी स्वतंत्र मॉल शासनाच्या जागेवर बांधण्यात येणार आहेत,असेही ड. कोकाटे यांनी सांगितले.

डॉ. हेमंत वसेकर यांनी सांगितले की, लातूर येथे १० हजार मे. टन शेती उत्पादन साठवता येतील असे सायलो तयार करण्यात येत आहेत. त्याद्वारे शेतकऱ्यांना शेतमाल साठवणुकीची सुविधा उपलब्ध होईल.

शेतकऱ्यांनी कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या अटीशर्तीतील बदल, पिकांसाठीच्या वाणांची उपलब्धता, यंत्रांची अनुदानावर उपलब्धता अशा विविध सुचना मांडल्या.

शेतातील मजूरीचा रोजगार हमी योजनेत समावेश करावा, प्रामुख्याने फळबागांसाठी अस्तरीकरणासह शेततळी, निर्यात सुविधा केंद्र उभारणी, हळद, अद्रक अशा पिकांची आधारभूत किंमत निश्चित करणे, मक्याचे वाण विकसित करणे, संरक्षित शेतीसाठी विमा योजना, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्यांना एमआयडीसीत जागा मिळण्यात आरक्षण, प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेच्या अनुदानात ३५ टक्क्यांवरुन ६० टक्क्यांपर्यंत वाढ, शेती प्रक्रिया उद्योग, सेंद्रीय शेतीसाठी लागणाऱ्या निविष्ठा विक्रीची सुविधा, शेतमाल वाहतुकीसाठी वाहन खरेदीसाठी अनुदान अशा विविध मागण्या मांडल्या.

# 'खजिन्याची शोधयात्रा' पुस्तकाच्या माध्यमातून देशाचे प्राचीन वैभव, इतिहास, संस्कृतीची मांडणी - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आत्ताच एक्सप्रकस**

**पुणे /प्रतिनिधी/** 'खजिन्याची शोधयात्रा' या पुस्तकाच्या लेखनासाठी प्रशांत पोळ यांनी व्यापक संशोधन आणि अभ्यास केला आहे. या पुस्तकाच्या माध्यमातून देशाचे प्राचीन वैभव, इतिहास, संस्कृती मांडण्यात आली असल्याने शासनाच्या माध्यमातून हे पुस्तक अधिकाधिक वाचकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल. पुस्तकाच्या माध्यमातून ज्ञानाचा मोठा खजिना जनतेपर्यंत जाईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.प्रशांत पोळ लिखित 'खजिन्याची शोधयात्रा' या पुस्तकाच्या बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, मध्य प्रदेशचे सार्वजनिक बांधकाम मंत्री राकेश सिंह, मंदिर स्थापत्य व मूर्तीशास्त्राचे अभ्यासक डॉ. गो. बं. देगलूरकर, स्नेहल प्रकाशनचे रवींद्र घाटपांडे, राष्ट्रीय पुस्तक न्यासचे संचालक व पुणे पुस्तक महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे आदी उपस्थित होते.प्रशांत पोळ यांचे पुस्तक लेखनासाठी अभिनंदन करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आपला इतिहास, परंपरा, संस्कृतीचे जतन करणे आपले कर्तव्य आहे. आपल्या समाजाचे तेज आणि आत्माभिमान संपविण्याचे काम परकियांनी केल्याने आपण पारतंत्र्यात गेलो. भारत समृद्ध देश होता, परकीय आक्रमकांनी आपल्या संपत्तीची लूट केली. आपले ज्ञान आणि संस्कृती ही आपली शक्ती आहे हे लक्षात घेऊन ज्ञानकेंद्रे उध्वस्त करणे, आपल्या संस्कृतीची प्रतिके जमिनदोस्त करणे आणि आपल्यावर त्यांची संस्कृती, परंपरेचा पगडा बसविण्याचे काम सातशेहून अधिक वर्ष चालले. त्यामुळे आपला इतिहास माहित नसलेल्या पिढ्या तयार झाल्या आणि भारत पारतंत्र्यात गेला. वेगवेगळ्या संशोधकांनी आपल्या संशोधनाने आपली संस्कृती भारताबाहेर गेली हा निष्कर्ष काढला आहे. जगातील इतर संस्कृती नष्ट पावल्या आहेत. पूर्वीपासून असलेली आणि अजूनही चालत आलेली भारत ही एकमेव संस्कृती आहे. ढोलावीरा, लोथलबद्दल प्रशांत पोळ यांनी पुस्तकात वर्णन केले आहे. आजच्या स्थापत्य शास्त्राला अपेक्षित गोष्टी सहा हजार वर्षापूर्वी असल्याचे त्यातून पहायला मिळते.युरोपीय देशात जेव्हा संस्कृतीची संकल्पना स्पष्ट नव्हती तेव्हा आपली संस्कृती विकसित स्वरुपात होती. संस्कृतसारखी भाषा विकसित स्वरुपात आपल्याला माहित होती. भारताचा हा ज्ञानाचा खजिना फार जुना आहे. ही सिंधू संस्कृतीदेखील आहे आणि सरस्वती संस्कृतीदेखील आहे. भौतिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या संपन्न अशी ही संस्कृती होती. पहिल्या शतकातले भारताचे जगातील व्यापारातले स्थान ३३ टक्के होते. आपल्या या इतिहासाची माहिती आपल्याला असायला हवी. देशाचा हा इतिहास, आपले वैभव आणि गणितात भारताने केलेली प्रगतीदेखील या पुस्तकातून मांडण्यात आली आहे.

देशात हिंदवी स्वराज्य, मराठ्यांचे साम्राज्य होते ते आपण शिकू शकलो नाही. त्यामुळे आपली संस्कृती ज्ञान आपल्याला माहिती पाहिजे आणि ते पुढेही न्यावे लागेल. आयुर्वेदातील संहितावरही संशोधन झाले पाहिजे. या पुस्तकातून सर्वांना मार्गदर्शन मिळेल. ज्ञानाची ही शोधयात्रा अशीच सुरू रहावी, अशी अपेक्षा फडणवीस यांनी व्यक्त केली.यावेळी मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील म्हणाले, भारताला जगद्गुरू पदापर्यंत पोहोचविण्यासाठी भारतीय ज्ञानपरंपरेची माहिती, जाणिव, महत्त्व लक्षात आणून दिले पाहिजे. त्यासाठीच नव्या शैक्षणिक धोरणात




भारतीय ज्ञानाची परंपरा समाविष्ट करण्यावर भर देण्यात आला आहे. पोळ यांच्या पुस्तकात प्राचीन काळातील व्यापार वैभवाचेही वर्णन करण्यात आले आहे. पुस्तकातून अशा अनेक नव्या बाबी मांडल्या आहेत.

मध्यप्रदेशचे मंत्री सिंह म्हणाले, भारतीय संस्कृतीचे पुनरुज्जीवन होत असताना लेखणीच्या माध्यमातून देशाचा इतिहासही नागरिकांसमोर येत आहे. हे पुस्तक भारताला जाणून घेण्यासाठीची आणि देशाच्या सांस्कृतिक वैभवाचे स्मरण करण्यासाठी दिलेली हाक आहे. प्रशांत पोळ यांच्यासारख्या लेखकांमुळे आपण देशाचे सांस्कृतिक वैभव अनुभवू शकतो. त्यांच्या लेखणीत प्रामाणिकपणासोबतच भारताच्या संस्कृती प्रति निष्ठा आहे, असे तंनी सांगितले. हे पुस्तक देशाच्या सर्व भाषेत प्रकाशित होऊन देशभरात पोहोचेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.डॉ. देगलुरकर म्हणाले, भारतीय संस्कृती जगातील पहिली संस्कृती आहे, ती समाजानुसार बदलणारी आहे. आपली संस्कृती प्रवाही आहे. वेद, उपनिषदे, भगवद्गीतेतील ज्ञान आपण जगासमोर ठेवले. आपली विचारांची श्रीमंती आपल्या लक्षात येत नाही. भारतीय संस्कृती, ज्ञानोपासना, विचारांकडे पाहिल्यास हा ज्ञानाचा खजिना जनतेसमोर येण्याची गरज आहे. असे भारतीय प्राचीन ज्ञान समाजासमोर आल्यास देशाचा अभ्युदय निश्चितपणे होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# जळगावच्या राजकारणात खळबळ!

राजकीय अज्ञातवासात असलेले जेष्ठ नेते व माजी मंत्री सुरेशदादा जैन यांनी आज जळगाव दौऱ्यावर आलेल्या शिवसेना ठाकरे गट नेते खासदार संजय राऊत यांची अचानक भेट घेतली. या दोन्ही नेत्यांमध्ये बंददाराआड चर्चा झाल्यानं जळगावच्या राजकीय वर्तुळात प्रचंड खळबळ माजली आहे.संजय राऊत हे दोन दिवसांच्या जिल्हा दौऱ्यावर असून ते आज सकाळी जळगाव विमानतळावर दाखल झाले. तिथेच सुरेशदादा जैन आणि राऊत यांच्यात गुप्त बैठक झाली आहे. या बैठकीत नेमकी काय चर्चा झाली, याबाबत कोणतीही अधिकृत माहिती मिळालेली नाही. मात्र, या अनपेक्षित भेटीमुळे जिल्ह्यातील राजकीय चर्चांना उधाण आले आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांदरम्यान सुरेशदादा जैन यांनी भाजपाला सक्रिय पाठिंबा दिला होता. मात्र आता शिवसेना (ठाकरे गट) नेत्याशी त्यांच्या बैठकीने राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

जळगाव महापालिकेच्या पार्श्वभूमीवर पाहता, सुरेशदादा जैन यांचा प्रभाव मोठा असून त्यांच्याभोवती एक मजबूत समर्थक वर्ग आहे. त्यामुळे शहराच्या राजकारणात ते 'गेम चेंजर' ठरु शकतात, असे जाणकारांचे मत आहे. संजय राऊत आणि जैन यांच्या या गूढ चर्चेमुळे आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जळगाव जिल्ह्यात नवे राजकीय समीकरण तयार होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

माजी मंत्री सुरेश जैन यांची राजकीय कार्किर्द मोठी आहे. राजकीय जीवनात सुरेश दादा जैन यांनी विविध पदांवर काम केलं आहे. ते १९८० मध्ये काँग्रेसचे आमदार म्हणून निवडून आले. त्यानंतर जळगाव नगरपालिकेत त्यांनी आपले स्वतंत्र पॅनल उभे केले. त्यात त्यांना यश मिळाले आणि जळगावचे नगराध्यक्षपदही त्यांनी भूषविले. १९८५ मध्ये ते समाजवादी काँग्रेसतर्फे आमदार झाले. १९९० मध्ये सरतचंद्र सिन्हा समाजवादी पक्षातर्फे ते निवडून आले. १९९५ मध्ये काँग्रेसतर्फे तर १९९९ मध्ये ते शिवसेनेतर्फे आमदार झाले. २००४ मध्ये शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे ते आमदार झाले. २००९ साली शिवसेनेतर्फे जळगाव विधानसभेतून आमदार झाले. १९८० पासून सक्रिय राजकारणात प्रवेश केल्यानंतर ते सलग ३४ वर्षे आमदार होते. हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी त्यांना मंत्रिपद दिले होते.

# आ. कोहळीकर यांच्यावर कारवाईची मागणी - पत्रकार संरक्षण समितीचे मुख्यमंत्र्यांना निवेदन



**आत्ताच एक्सप्रकस**

**देगलूर / प्रतिनिधी /** हदगाव येथील दैनिक देशोन्नतीचे तालुका प्रतिनिधी पत्रकार संजय सुर्यवंशी यांनी मौजे निवघा तळणी सर्कलमधील पंचवीस गावे २५ तासांपासून अंधारात, महावितरणचे अधिकारी नॉट रिचेबल या शीर्षकाखाली वस्तुनिष्ठ बातमी प्रकाशित केली. मात्र, या बातमीनंतर हदगाव-हिमायतनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाबुराव कोहळीकर यांनी पत्रकार सुर्यवंशी यांना अश्लील भाषेत शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे.या प्रकाराचा पत्रकार संरक्षण समितीने तीव्र निषेध नोंदवत ही घटना पत्रकार स्वातंत्र्यावर थेट आघात करणारी असल्याचे म्हटले आहे. समितीचे तालुकाध्यक्ष शेख असलम यांनी सांगितले की, सत्य मांडणाऱ्या पत्रकारांना धमक्या देणे म्हणजे लोकशाही मूल्यांची पायमल्ली असून अशा प्रकारावर कठोर कारवाई व्हावी.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित आमदारावर तात्काळ गुन्हा दाखल करावा, अन्यथा संपूर्ण महाराष्ट्रभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा पत्रकार संघटनेने दिला आहे.पत्रकारांच्या सुरक्षेसाठी शासनाने तात्काळ पावले उचलावीत, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली असून हे निवेदन उपविभागीय अधिकारी अनुप पाटील यांच्या मार्फत मा. मुख्यमंत्री यांना सादर करण्यात आले आहे.

या निवेदनावर पत्रकार संरक्षण समितीचे अध्यक्ष शेख असलम, सचिव गजानन टेकाळे, कार्याध्यक्ष धनाजी देशमुख, प्रसिद्धीप्रमुख धनाजी जोशी, प्रेस संपादक पत्रकार सेवा संघाचे राज्य उपाध्यक्ष विशाल पवार, इलेक्ट्रॉनिक मीडिया अध्यक्ष सय्यद समी, तसेच सुनील मदनुरे, प्रभू वंकलवार, अनिल पवार, संजय हाळदे, इस्माईल खान आदींसह अनेक पत्रकारांनी स्वाक्षऱ्या करत एकमताने निषेध व्यक्त केला आहे.

# मिठी नदी गाळउपसा घोटाळ्यातील मास्टर माइंड मोकाट आणि छोट्या ठेकेदारांवर फास- भाजपा मुख्य प्रतोद प्रसाद लाड

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** मिठी नदी गाळउपसा प्रकरणी किमान १००० कोटी रुपयांच्यावर घोटाळा झालेला असताना सध्या बृहन्मुंबई महानगरपालिका आणि पोलिसांकडून होणारी चौकशी ही मोठे मासे अडकलेल्या मुख्य घोटाळयाकडे दुर्लक्ष करून केवळ ३ ते ७ कोटी रुपयांच्या पारंपारिक निविदा राबविणाऱ्या छोट्या ठेकेदारांवर लक्ष केंद्रित करण्यावर भर देणारी आहे. त्यामुळे या घोटाळ्यातील मुख्य सूत्रधार मोकाट फिरत असून मुख्य तक्रारींपासून चौकशी जाणूनबुजून भरकटवली जात आहे, असा आरोप भाजपा उपाध्यक्ष आणि विधान परिषदेतील पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार प्रसाद लाड यांनी केले आहे.मुंबईतील मिठी नदीतील गाळ काढून पावसाळ्यात मुंबई तुंबण्यापासून वाचविण्यासाठी दरवर्षी बृहन्मुंबई महानगरपालिका निविदा काढते. त्यात गेल्या तीन वर्षांमध्ये तब्बल १००० कोटी रुपयांच्या वर घोटाळा झाला आहे आणि त्यामुळे करदात्या मुंबईकरांची घोर फसवणूक झाली आहे. घोटाळ्याची ही सुरस कथा पालिकेतील अधिकारी प्रशांत रामघुडे यांनी रचली असून त्यांनी 'सिल्ट पुशर' आणि 'पल्स प्लाझ्मा' सामंजस्य करार या संकल्पना राबवून अतिशय कुशलतेने मिठी नदीच्या गाळ काढण्याच्या कंत्राटांमध्ये कोट्यावधींचा घोटाळा केला आहे.भाजपाचे उपाध्यक्ष आणि विधान परिषदेतील पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार प्रसाद लाड यांनी शुक्रवारी भाजपा मुख्यालयात एक पत्रकार परिषद घेवून तत्संबधीची अत्यंत स्फोटक अशी माहिती माध्यमांसमोर खुली केली. गेले काही महिने मेहनत आणि अभ्यास करून त्यांनी ही माहिती पालिकेकडून मिळविली आहे. स्पेको इन्फ्रास्ट्रक्चर, स्कायवे इन्फ्रास्ट्रक्चर, तनिशा, त्रिदेव, एमबी ब्रदर्स या कंपन्यांना ही कंत्राटे मिळावीत म्हणून पद्धतशीरपणे योजना आखली गेली आणि त्यातून हा भ्रष्टाचार केला गेला असे, श्री. लाड यांनी म्हटले आहे.प्रशांत रामघुडे यांनी सिल्ट पुशर आणि टॅक्सोर यंत्रांसाठी बनावट फेअर आयटम्स मुंबई महानगरपालिकेच्या निविदा प्रणालीत समाविष्ट केले. पूर्वी पारंपरिक गाळउपसा प्रति मेट्रिक टन ११०० ते १२०० रुपये दराने केला जात होता आणि तो १६०९ रुपये प्रती टन या निविदेतील निर्धारित दरापेक्षा कमी होता. मात्र गाळकाढीचे प्रमाण दरवर्षीच्या ६०,००० मेट्रिक टनवरून वाढवून ९०,००० मेट्रिक टनपर्यंत वाढवण्यात आले. त्यासाठी रामघुडे यांनी दोन नविन दर प्रणाली आणल्या आणि त्यांचे दर 'सिल्ट पुशर' वापरून गाळउपशासाठी २३६६ रुपये प्रती मेट्रिक टन आणि टॅक्सोर वापरून गाळउपशासाठी २१९३ रुपये प्रती मेट्रिक टन असा दर दिला गेला. निविदा बनावट पद्धतीने मंजूर करून दर ५०० ते ७०० रुपयांनी म्हणजे तब्बल ३५ टक्क्यांनी फुगवले गेले. या घोटाळ्यात एमबी ब्रदर्स, तनिषा, त्रिदेव व इतर ठेकेदारांना प्राधान्य देण्यात आले. हे सर्व भूपेंद्र पुरोहित यांच्याशी संबंधित असल्याचे सांगितले जाते.

यंत्रांच्या करारपत्रांचे सामंजस्य करार नियंत्रण मध्यस्थ असलेल्या केतन कदम यांच्याकडे होते, ज्यामुळे फक्त निवडक ठेकेदारच या निविदांसाठी पात्र ठरू शकत होते. ज्या यंत्रांची मूळ किंमत ५० लाखांपेक्षा जास्त नाही, त्यांच्यासाठी दरवर्षी ४ कोटी रुपये भाडे घेतले गेले, व तेच भाडे निविदांमध्ये दाखवून मंजूर करण्यात आले. ही सगळी योजना प्रशांत रामघुडे यांच्या प्रभावाखाली काम करणाऱ्या घनकचरा विभागाने मान्य केली. या बेकायदेशीर दरवाढ आणि स्पर्धेला रोखणाऱ्या निविदांमुळे काही वर्षांतच ५०० कोटी रुपयांचा घोटाळा झाला, असेही श्री. लाड यांनी म्हटले. यंदा कमला कन्स्ट्रक्शन या कंपनीने उच्च न्यायालयात यासंदर्भात याचिका देखील दाखल केली होती.

अशाच प्रकारे 'पल्स प्लाझ्मा' घोटाळासुद्धा झाला असून तो तब्बल ५०० कोटी रुपयांचा आहे. मिठी नदीचे रुंदीकरण, खोलीकरण, रिटेनिंग वॉल आणि सर्व्हिस रोडचे बांधकाम या कामांचा यात समावेश होता आणि त्यासाठी श्री. रामघुडे यांनी 'ड्राय वेदर फ्लो' फेरफार व 'रॉक ब्लास्टिंग'साठी पल्स प्लाझ्मा तंत्रज्ञान वापरून चार निविदा जाहीर केल्या. या निविदांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करून ५०० कोटी रुपयांचा घोटाळा केल्याचा संशय आहे. या निविदा ३० टक्के अधिक दराने स्पेको आणि स्कायवॉक इन्फ्रा या कंपन्यांना प्रत्येकी दोन निविदा अशा पद्धतीने मंजूर करण्यात आल्या. निविदांमध्ये अट घालण्यात आली होती की, पल्स प्लाझ्मा मशिनरीसाठी कोरियन कंपनी दत्तात्रय इंक. बरोबर सामंजस्य करार करणे आवश्यक असेल. करार खासकरून केतन कदम आणि प्रशांत रामघुडे यांनीच निवडक ठेकेदारांना मिळवून दिले. निविदा प्रक्रिया पूर्णपणे बनावट आणि पूर्वनियोजित होती. स्पर्धा टाळण्यासाठी काही बनावट कंपन्या फक्त नावापुरत्याच सहभाग घेत होत्या. प्रगत तंत्रज्ञानाचा कथित वापर आणि सामंजस्य करार यांच्या एकाधिकारामुळेच ५०० कोटी रुपयांच्या घोटाळ्याची पायाभरणी झाली. पल्स प्लाझ्मा तंत्रज्ञानाचा उपयोग मिठी नदीत पाण्याखाली रॉक ब्लास्टिंगसाठी करायचा होता. त्यासाठी श्री. रामघुडे यांनी नवीन दरसुद्धा तयार केले. परंतु प्रत्यक्षात असे कोणतेही काम झालेच नाही.

रामघुडे आणि कदम यांनी फसव्या निविदा, मंजुरी आणि फुगवलेल्या करारांचे एक सुव्यवस्थित जाळे तयार केले आणि सरकारी तिजोरीतून शेकडो कोटी रुपये लुटले. पल्स प्लाझ्मा आणि सिल्ट पुशर तंत्रज्ञानासाठी प्रत्येकी ५०० कोटी रुपयांचा घोटाळा ४ वर्षांमध्ये झाला आहे. आश्चर्य म्हणजे,या प्रकरणी झालेल्या तक्रारींचा तपास व सद्यस्थितीत दाखल करण्यात आलेला एफआयआर या मुख्य घोटाळ्यावर लक्ष केंद्रीत करत नाही, तर लहान व पारंपरिक पद्धतीने काम करणाऱ्या ठेकेदारांच्या ३ ते ७ कोटी रुपयांच्या कंत्राटांवर लक्ष केंद्रीत करतो, असेही श्री. लाड यांनी पुढे म्हटले आहे.

यामुळे तपास फक्त ६५ कोटींच्या घोटाळ्यापुरता मर्यादित आहे आणि मोठे मासे मात्र मोकाट सुटलेले आहेत आणि खरे सूत्रधार अजूनही मोकाट आहेत व त्यांच्या कारवाया बिनबोभाट सुरू ठेवत आहेत. लहान गाळउपसा ठेकेदारांनी गेल्या १० वर्षांत पारंपारिक आणि नियमबद्ध पद्धतीने कामे केली आहेत. यातून हे स्पष्ट होते की खऱ्या घोटाळ्यापासून लक्ष हटवून लहान व निष्पाप ठेकेदारांवर खापर फोडले जात आहे, तर मोठ्या घोटाळ्याचे सूत्रधार अजूनही मोकळे फिरत आहेत. मूळ तक्रार फक्त तीन वर्षांत घडलेल्या सुमारे १००० कोटी रुपयांच्या घोटाळ्याशी संबंधित आहे, आणि त्याची चौकशी केंद्रित पद्धतीने सर्वसमावेशक अशी व्हायला हवी, अशी आमची मागणी आहे, असेही श्री. लाड यांनी म्हटले आहे.

# सर्वच कल्याणकारी योजनांची एस आय टी (SIT) मार्फत चौकशी झाली पाहिजे

महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार संघटना स्वतंत्र कृती समितीच्या कामगार नेत्याचे माननीय मंत्री संजयजी सिरसाठ सामाजिक न्यायमंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री छत्रपती संभाजी नगर यांना जाहीर आव्हान.महोदय आपण भांडी पेटी वाटप करतांना जे पाहिले ते एक छोटेशे उदाहरण होते. हे छोट छोटे कंत्राटी चोर, दलाल पाहण्या पेक्षा जे सर्वात मोठा करोडो रुपयाचा दिवसा ढवळ्या निधी पळवळतात. त्यांच्या कडे आपण लक्ष द्यावे.जे की कामगारांच्या कष्टातून जमा होतो त्या



पैशाचा ज्यांनी मध्यान्ह भोजनाच्या नावाखाली कामगारांची तिजोरी म्हणजेच कल्याणकारी मंडळाची तिजोरी लुटली ती शंभर टक्के बोगस याद्या लाऊन,बोगस कामगार,बोगस गाव,बोगस साइड,बोगस कामाचे ठिकाण,बोगस कागदपत्री न जेवण देता मध्यान्ह भोजन तसेच रात्रीचे भोजन च्या नावाखाली कामगारांचे पैसे कंत्राटदार कंत्राटी कर्मचारी आणि भ्रष्ट अधिकारी यांनी मंत्री ह्यांना सोबत घेऊन जी लूटमार केली.त्या मध्यान्ह भोजन तसेच रात्रीचे भोजन ची न्यायालयीन चौकशी एस आय टी मार्फत होऊ द्यावी. आम्ही कामगार संघटना वाले अनेक पुरावे देऊ. तो साधा सुधा घोटाळा नाही तर करोडो रुपयाचा घोटाळा आहे.या विरोधात आम्ही ट्रेड युनियन १९२६ ॲक्ट नुसार नोंदणीकृत कामगार संघटना वारंवार सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,प्रधान सचिव कामगार,कामगार आयुक्त यांना लेखी पत्र व्यवहार करून व प्रत्येकक्ष भेटून सांगितले असता त्याची साधी दखल घेतल्या गेली नाही.

संघटना सांगतात घोटाळा होतोय कामगारांचा पैसा कामगारांच्या कल्याण करिता न वापरता गुत्तेदार कंत्राटदार आणि अधिकारी ह्यांचं कल्याण होत आहे.यांचे कारण सरकारचे लोकप्रतिनिधी आणि अधिकारी त्यात शंभर टक्के सहभागी झाले आहेत. ही गुत्तेदारी बंद करून जो आपल्याकडे जी आर राज्यपाल महोदयाचा आदेश आहे. की वस्तू रुपात भेट वस्तू देऊ नका, त्याची अंमलबजावणी करा तरी सरकार ठेकेदारावर एवढी मेहेरबान का ? याची पण एस आय टी मार्फत चौकशी करण्यात यावी.काही जिल्ह्यात तर मध्यान्ह भोजन आणि रात्रीचे भोजन तर फक्त कागदपत्री बिल उचलणे साठीच होते असे कित्तेक पुरावे आहेत जे ओरडून ओरडून सांगीतल्या जातात पण कोणी दखल घेत नाही.मध्यान्ह भोजन तसेच रात्रीचे भोजन हे बोगस आहे आणि ह्यात सरकार अधिकारी आणि कंत्राटदार ह्यांनी मिळून कामगारांचा पैसा गिळून घेतला, सर्वांना माहीत आहे की मध्यान्ह भोजन होत त्यात वरी उल्लेख केल्या प्रमाणे खूप जिल्ह्यात मध्यान्ह भोजन नसताना बिल उचलले त्यात हा विषय असा की ज्या ठिकाणी मध्यान्ह भोजन होत त्या ठिकाणी रात्रीचे भोजनचे पण बिल उचलले रात्रीचे भोजन हे कुठ देत होते दिवसा कामगार कामावर असतो मग रात्री कामगार घरी जाणार ना रात्री चे जेवण कंपनी काय कामगारांच्या घरी जाऊन दरवाजा वाजून खाऊ घालत होती का..?

मा.मंत्री महोदय जे बोगस कामगार ची यादी आपण म्हणत आहात ना ती बोगस गिरी ह्या कंत्राटदार ह्यांनी निर्माण केली असे म्हटलं तर काही आश्चर्य वाटणार नाही. कारण मध्यान्ह भोजन जे की असंघटित कामगारांना नोंदणी नसताना भोजन दिलं असे दाखवून बिल काढल् गेल,नंतर जी आर आला की नोंदणीकृत बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन दिले जाईल.त्या वेळेस कंत्राटदार ह्यांनी ती योजना जीवित ठेवणे साठी प्रत्येक गावा गावात एजंट तयार केले आणि नोंदणी केली प्रत्येक जिल्ह्यातील व्यवस्थापक ह्यांनी एजंट लोकांन कडून कागदपत्र मागवले आणि नोंदणी केली व मध्यान्ह भोजन जीवित ठेवले,पुढ मध्यान्ह भोजन व रात्रीचे भोजन बंद झाले. पण ते व्यवस्थापक अजून कार्यरत आहेत कंत्राट कोणाला पण मिळो व्यवस्थापक तोच आहे.मग त्यांनीच निर्माण केलेले एजंट भांडी पेटी साठी पैसे घेत असतात. नोंदणीकृत संघटना आपले संघटन मजबूत करून असंघटित बांधकाम कामगारांच्या कल्याणा करिता सनदशीर मार्गाने संघर्ष करत आले आहेत. नोंदणी पासून ते लाभा पर्यंत संघटना ही कामगारांना शासनाच्या योजनाची माहिती देण्यासाठी प्रचार व प्रसार करत असते.सरकार,कल्याणकारी मंडळ ह्याच योजनेच्या प्रसार आणि प्रचारसाठी करोडो रुपये खर्च करता असतात.गरज नसताना होल्डिंग्स लावता त्याच पण कंत्राट देण्यात येते.काही दिवसापूर्वी तर गावा गावात व शहरी भागात प्रत्येक ठिकाणी प्रचार प्रसारसाठी गाडी वॅन नेमली होती, त्याच पण कंत्राट दिलं खूप पैसे दिले पण काही प्रचार झाला,ना प्रसार झाला नाही. यांची पण एस आय टी (डखढ) मार्फत चौकशी होऊन अहवाल मागवला पाहिजे.

संघटना कामगारांचं संघटन मजबूत करण्यासाठी कामगारांकडून वार्षिक,संघर्ष निधी आणि देणगी स्वरूपात योगदान घेत असतात.पुढे संघटना ह्या असंघटित बांधकाम कामगारांना न्याय हक्क अधिकार मिळवून देण्यासाठी रस्त्यावरची लढाई,व कार्यालयीन पत्र व्यवहार करून लढाई लढत असतात.शेवटी कामगारांच्या हितासाठी संघटना न्यायालयीन लढाई लढते त्याला खूप पैसा लागतो.आणि वेळ जातो. म्हणूनच हा असंघटित बांधकाम कामगार वेळोवेळी रस्त्यावर उतरत जन आंदोलन करून लक्षवेधून घेत आला आहे. हे विसरून चालणार नाही.मंडळाच्या स्थापने आधी पासून संघटना कार्यरत होती तेव्हा कायदे बनविण्यासाठी संघर्ष करीत होती.आता मंडळाचे गठण हे त्रिपक्षीय मंडळाने स्थापन झाले आहे. पण त्यात मालक प्रतिनिधी,कामगार प्रतिनिधी नाहीत.शासन प्रतिनिधी मनमानी कारभार चालवत आहे. या विरोधात वेळोवेळी संघटना आवाज उचलत आली आहे.कामगार संघटना पदाधिकारी हार मानून गप्प बसत नाही. वेळोवेळी त्या असंघटित कष्टकरी कामगारांसाठी कामगार मेळावा,प्रशिक्षण शिबिर,आरोग्य शिबिर,व्यसन मुक्ती संदेश,व्यक्तिमत्व विकास,पाल्ल्याचा होणारा शिक्षणाने विकास, स्वच्छता,संरक्षण कायदा,माहिती अधिकार अशा अनेक विविध प्रकारच्या कामगार हितासाठी संघटना वर्षभर काम करत असतात. मंडळाकडे ह्या संघटना शिबिर मागतात तर भांडी पेटी चे शिबिर मिळत नाहीत पण एजंट लोकांनना सोबत धरून अधिकारी व कंत्राटदार आपली पोळी भाजत असतात.करीत असंघटित कष्टकरी कामगार बंधु भगिनीनो खरे कामगारांचे शत्रू कोण ते ओळखा.महाराष्ट्रातील बांधकाम कामगार संघटना स्वतंत्र कृती समितीच्या बॅनर खाली नोंदणीकृत सतर कामगार संघटना संघटित झाल्या आहेत.त्यांनी वेळोवेळी पत्रव्यवहार आणि जन आंदोलन केले आहे. ते करून ती थांबली नाही तर न्यायालयात सुद्धालढली.

कर्नाटक,राजस्थान राज्याच्या धर्तीवर नोंदणीकृत,व लाभार्थी कामगारांची नांव,गांव,रक्कम पोर्टल वर जाहीर करावी.जमा खर्च पोर्टल वर दाखवा.मंडळाचे डेलळरश्र -ींविळीं झाले पाहिजे.सेवा हमी कायदा लागु करण्यात आला पाहिजे.आता माननीय संजय सिरसाठ मंत्री महोदय यांनी त्यांच्या मतदार संघात जे पहिले त्या विरोधात आवाज उठवला. म्हणूनच मध्यान्ह भोजन ची न्यायलाईन चौकशी एस आय टी मार्फत झाली तर सुरक्षा संच,भांडी पेटी,शिक्षण, प्रशिक्षण,आरोग्य शिबिर सर्वच कल्याणकारी योजनांची चौकशी झाली पाहिजे. यावर आपण सामाजिक न्याय मंत्री म्हणून विशेष लक्ष घालावे आणि लाखों मागासवर्गीय असंघटित कष्टकरी बांधकाम कामगारांना न्याय मिळवून द्यावा हीच आपल्या कडून असंघटित कष्टकरी बांधकाम कामगारांची अपेक्षा

**-अजय कांबळे**

**प्रदेश अध्यक्ष :- महाराष्ट्र संघर्ष अभियान श्रमिक संघ**

**संलग्न :- महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार संघटना स्वतंत्र कृती समिती**



## संक्षिप्त

### दिव्यांग व्यक्तींच्या स्वंयरोजगारासाठी बीज भांडवल योजना;ऑफलाईन पद्धतीने अर्ज मागविले

**आत्ताच एक्सप्रकस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर या कार्यालयातील दिव्यांग व्यक्तीना स्वंयरोजगारासाठी बीज भांडवल योजना सन २०२५-२६ वर्षा करीता अर्ज मागणी सुरु करण्यात येत आहे. ही योजना बँके मार्फत १.५ लक्ष रु.कर्ज बँकेच्या नियमानुसार मंजूर झाल्यानंतर समाज कल्याण कडून मंजूर कर्जाच्या २० % रक्कम सबसिडी म्हणून दिली जाते.

योजनेकरीता दिव्यांग प्रवर्गातील अंध, कर्णबधीर, अस्थिव्यंग हे व्यकती अर्ज करु शकतात. परंतु मतीमंद (बौद्धिक अक्षम) प्रवर्गातील दिव्यांग व्यक्तीस अर्ज करता येणार नाही. अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्ष याच्या आताच असावे. तहसिलदार यांचे मार्च २०२६ पर्यंत वैद्य असलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र जोडावे. तहसिलदार यांचे रहिवासी प्रमाणपत्र जोडावे, बेरोजगार प्रमाणपत्र व ठराविक व्यवसायासाठी चे ना हरकत प्रमाणपत्र जोडावे, रेशन कार्ड, मतदान कार्ड, आधार कार्ड, दिव्यांग (णऊखऊ) प्रमाणपत्र ४०% किंवा त्यापुढे असावे. दोन पासपोर्ट फोटो अर्जास जोडावे. व्यवसयाचे कोटेशन व प्रकल्प अहवाल जोडावा. जागे बाबत भाडे पावती, करारनामा, मालकी हक्क पुरावा इ. जोडावे. अर्जदाराने अर्जातील सर्व अटी - शर्ती व्यवस्थित वाचूनच अर्ज करावा. अर्जासोबत सर्व आवश्यक कागदपत्रे जोडून अर्ज समाज कल्याण कार्यालय येथे सादर करावयाचा आहे. अर्ज करण्याची मुदत दि.१ जून २०२५ ते १५ जुलै २०२५ पर्यंत राहील. असे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी साहेबराव चव्हाण यांनी केले आहे.

### बेवारस वाहनाच्या मालकास आवाहन

**आत्ताच एक्सप्रकस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** पोलीस स्टेशन बेगमपुरा येथ गुरन ख ६८ /२०१२ कलम ३०४ (अ), २७९,३३८ भादवि मधील जप्त वाहन ट्रक क्रमांक चक-२०-इ-८०७२ वाहन असल्याबाबत खात्री करुन या वाहनांचे कागदपत्रासह बेगमपूरा पोलीस स्टेशन येथे सात दिवसाच्या आत संपर्क करावा. तसेच पुढील दिलेल्या संपर्क क्रमांकावर संपर्क करावा. ९८२३४५१३५७ व ९७६४६४७४८२ तसेच अन्यथा वाहनांचा लिलाव करुन जमा झालेली रक्कम शासनाच्या कोषागार कार्यालयात जमा करण्यात येईल. असे आवाहन पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन (शहर) बेगमपूरा यांनी केले आहे.

### नादरपुर येथील ३६ वर्षीय तरुण शेतकऱ्यांची गळफास घेऊन आत्महत्या

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड/प्रतिनिधी/सुनिल निकम**/कन्नड तालुक्यातील नादरपुर येथील ३६ वर्षीय तरुण शेतकऱ्याची चिंचोयाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शुक्रवार सायंकाळी उघडकीस आली.सोपान कचरू निकम ( ३६.)असे आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याचे नाव आहे. सोपान कचरू निकम यांची



नादरपुर शिवारात वडिलांच्या नावे शेती आहे त्यांच्यावर खाजगी कर्ज असल्याने शेतीची नापकी झाल्यामुळे नैराश्यातून गट नंबर १४८ मध्ये चिंचोर्याच्या झाडाला गळफास लावून आत्महत्या केली. आजूबाजूच्या शेतकऱ्यांची ही बाब लक्षात येतात पोलीस पाटील रामकिसन सोनवणे यांनी पिशोर पोलिसांना माहिती कळवली. पिशोर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी नागवे यांच्या मार्गदर्शनाखाली बीट अंमलदार किरण गंडे यांनी पंचनामा करून नाचनवेल येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले.नाचनवेल येथील डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले.सकाळी दहा वाजेच्या सुमारास नादरपूर येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.त्यांच्या पश्चात आई, वडील,पत्नी, दोन मुले असा परिवार आहे. पिशोर ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास सपोनी नागवे यांच्या मार्गदर्शनाखाली बीट अंमलदार किरण गंडे करीत आहे.

### कऱ्हाळा गावात रात्री घर फोडून अज्ञात चोरांनी रोकडसह दागिने पळविले

**आत्ताच एक्सप्रेस**

**आष्टी/ प्रतिनिधी/** परतुर तालुक्यातील आष्टी पोलिस ठाणे हद्दीतील कराळा कऱ्हाळा गावातील लक्ष्मण मदनराव सोळंके यांच्या घरावर आज्ञात चोरट्यांनी रात्री घरफोडी केली. यात कपात मध्ये ठेवलेले दागिने चोरट्यांनी चोरून नेले.याप्रकरणी आष्टी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. आधिक माहिती लक्ष्मण मदनराव साळुंखे यांच्या रात्री घरामध्ये चोरांनी प्रवेश करून विविध वस्तू चोरून गायब झाले. आईवडील पत्नी मुलाबाळासह जेवनकरून रात्री १० वाजेच्या दरम्यान सर्व आपआपल्या



रुममध्ये जावुन झोपी गेले होते. दिनांक ३० रोजी रात्री १ वाजेच्या सुमारास लक्ष्मण यांची आजी सरुबाई किसनराव सोळंके यांनी आ-वाज दिला, आपल्या घरात चोरी झाली आहे. तेव्हा रुमचा दरव-ाजा उघडण्यास गेले असता दरवाजा बाहेरुन बंद होता. वडील मदनराव सोळंके यांनी रुमचा दरवाजा उघडला रुमच्या बाहेर आले तेव्हा घरातील सामान अस्थवेस्त पडलेले दिसले. घराची पाहणी केली असता घराच्या मागील दरवाज्याची कड़ी कोंडा तोडून घरात प्रवेश करून कोणीतरी अज्ञात चोरट्याने घरातील कपाटाचे लॉकतोडुन किमतीमुद्देमाल चोरून नेला आहे. ३.२५००० रु- नेकलेश, झुंबरवेल, लॉकेटसाखळी, ०६ नग अंगल्या, कानातील फुल, कानातील बाळी व मनुपोत (मंगळसुत्र) एकुण वजन १४५ ग्राम असे पिवळ्या धातुचे जुने सोन चोरून नेला.२५०००-रु. बाजुबंद, कडे ०४ नग, चैन ०५ नग बांगडी ०४ नग एकुण वजन ३९५ ग्राम पांढ-या धातुचे जुने व नगदी १६५००० रुपयांचा असे एकूण ५१५००० रु किंमतीचा मुद्देमाल आणि आज्ञात चोरांनी चोरून नेला आहे या प्रकरणी आष्टी पोलिस ठाण्यात चोराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे पुढील तपास आष्टी ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश सुरवसे करीता आहेत. तर सहकार्य उपनिरीक्षक अजित चाटे व विनोद वाघमारे करीत आहेत.

---

**विभागीय आयुक्त दिलीप गावडे सेवानिवृत्त**

# शासकीय सेवेत सर्वसामान्यांसाठी काम केल्याचा आनंद- दिलीप गावडे

**आत्ताच एक्सप्रकस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** मराठवाडयात विभागीय आयुक्त म्हणून काम करताना एक दिवस गावकऱ्यांसोबत, सस्ती अदालत, संवाद मराठवाडयाशी असे उपक्रम राबवून सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न केला. शासकीय सेवेत विविध पदावरून सर्वसामान्यांसाठी काम केल्याचा आनंद मिळाला अशी भावना विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी व्यक्त केली. आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून विविध उपक्रम लोकाभिमूख करणारे अधिकारी अशी ओळख असणारे श्री. गावडे आज (३१ मे) रोजी नियत वयोमानानूसार सेवा निवृत्त होत आहेत.

विभागीय आयुक्त कार्यालयातील सभागृहात आयोजित निरोप समारंभात त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जालन्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, परभणीचे जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, धाराशिवचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्यासह जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, अपर आयुक्त विजयसिंह देशमुख, डॉ. अनंत गव्हाणे, अपर आयुक्त खुशालसिंह परदेशी, सहआयुक्त (नगर परिषद प्रशासन) देविदास टेकाळे, उप आयुक्त (आस्थापना) सुरेश बेदमुथा, विभागीय आयुक्त गावडे यांच्या पत्नी मनिषा गावडे यांच्यासह प्रशासनातील अधिकारी उपस्थित होते.



गावडे म्हणाले, शासकीय सेवेत उपजिल्हाधिकारी पदावरून सुरूवात केली असून राज्यातील विविध विभागात ३५ वर्ष सेवा केली आहे. सर्वसामान्य माणसासाठी काम करताना समर्मित भावनेने काम केले आहे. पुणे, सांगली, सातारा, अहिल्यानगर तसेच विदर्भातही काम करण्याची संधी मिळाली. सेवानिवृत् होताना मराठवाडयात सेवा करण्याची संधी मिळाली, व या से-वेत कामाचा मोठा आनंद मिळाला. विभागातील प्रश्न सोडविण्यासाठी कमी वेळेत ऑनलाईन उपक्रमातून सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. से-वेत समवेत काम करणाऱ्या प्रत्येक अधिकारी तसेच नागरिकांनी सहकार्य केले असल्याचे सांगताना गावडे यांनी सेवा कालावधीतील प्रसंगानिहाय आपले अनुभव विषद केले.यावेळी विभागातील सर्व जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच विभागनिहाय अधिकारी यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी अपर आयुक्त सुरेश वेदमुथा यांनाही सेवानिवृत्तीनिमित्त निरोप देण्यात आला. वेदमुथा यांनी मराठवाडयात सर्व एकत्रितपणे काम करतात, याचा अनुभव आपल्याला आल्याचे सांगितले. पुणे जिल्हयातील गावडेवाडी सारख्या छोटे गाव ते विभागीय आयुक्त असा आयुक्तांचा प्रवास आमच्यसाठी प्रेरणा देणारा असल्याचे सांगितले.प्रास्ताविक अपर आयुक्त परदेशी यांनी केले, त्यांनी गावडे यांच्या सेवाकालावधी व त्यांनी राबविलेल्या विविध उपक्रमाची माहिती दिली. यावेळी विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

---

## संजय गांधी श्रावणबाळ योजनेच्या फायली तात्काळ मंजूर करा प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेची मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर /प्रतिनिधी/** सुभान शहा/गंगापूर तहसील कार्यालयामध्ये संजय गांधी श्रावणबाळ योजनेचा लाभ घेण्यासाठी फायली दाखल केल्या आहेत परंतु ते फायली दोन - दोन वर्षे मंजूर करण्यात येत नाही. व अधिकारी व काही दलाल लाभार्थींची लूट करीत आहेत ही लूट तात्काळ थांबवावे व तसेच संजय गांधी श्रावणबाळ योजनेच्या फायली तात्काळ मंजूर करण्यात यावी या मागणीसाठी गंगापूर तहसील कार्यालय समोर प्रहार दिव्यांग क्रांती संघटनाच्या वतीने तहसीलदार यांचा दहावा व तेराव्याचा कार्यक्रम आंदोलन करण्यात आले होते. यावेळी संघटनेचे कार्यकर्ते बोलत होते



पुढे बोलताना सांगितले की संजय गांधी श्रावणबाळ योजनेच्या विभागातील अधिकारी यांनी आम्हाला तोंडी आश्वासन दिले आहे. की पुढील एक महिन्यात जेवढे काही प्रलंबित फायली आहे तेव्हढे मंजूर करण्यात येतील. पुढील एक महिन्यात आमच्या मागण्या पूर्ण करण्यात आल्या नाही तर आमची आंदोलनाची दिशा ठरविण्यात येईल व वर्षे श्राद्ध कार्यक्रम आंदोलन करण्यात येईल असे आंदोलन कर्ते यांनी सांगितले.

तसेच गंगापूर तहसील कार्यालयामध्ये दलालांचा रोष वाढलेला आहे तहसीलदार यांनी दलालांचा तात्काळ बंदोबस्त करावे. यासाठी आम्ही तहसी-लदार यांच्याकडे लेखी तक्रार देखील केलेली आहे परंतु अद्याप कोणतिही कार्यवाही तहसीलदार यांच्याकडून करण्यात आलेली नाही.

दोन-दोन वर्षापासून संजय गांधी श्रावणबाळ योजनेच्या लाभासाठी दिलेल्या फायली मंजूर करण्यात येत नाही यासाठी प्रहार दिव्यांग क्रांती संघटनाच्या वतीने आंदोलन करण्यात आले होते. यावेळी प्रहार दिव्यांग क्रांती संघटनांचे कार्यकर्ते व दिव्यांग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कानडगाव- सुलतानपूर रस्त्यामधील पुल नागरिकांसाठी खुला,त्रास थांबला

**गत पावसाळ्यात शालेय विद्यार्थी नौकरदार व्यापारी आजारी वयोवृद्ध बालके नागरिकांचे झाले होते हाल**

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद/ प्रतिनिधी/** खुलताबाद तालुक्यातील कानडगाव-सुलतानपूर साठी तथा बाजार सावंगी सर्कल साठीचा रस्ता तथा गिरिजा नदीवरील पूल काम आखेर पुर्ण केल्याने ये जा साठी खुला ( बहाल) करण्यात आला आहे.सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत पुल काम गुत्तेदार करवी हाती घेण्यात आले होते कामात दिरंगाई चालढकल होत असल्याने गतवर्षी सर्कल तथा विशेष करुन



कानडगाव येथील नागरिकांना पुला अभावी हाल झाले होते नागरिकाचे सतत पाठपुरावा करत विभागाला कामा संदर्भात अवगत केले होते.याची दखल साबांवि उप अभियंता कोलते यांनी गंभीरपणे घेवून नागरिकांचा त्रास बघता तातडीने काम करण्या संदर्भात आदेशीत केले होते आखेर पुलाचे काम पूर्ण होऊन नागरिक तथा वाहनधारकांसाठी पुल रस्ता खुला करण्यात आल्याने नागरिक वाहनधारक शेतकरी ग्रामस्थांतून आनंद व्यक्त करण्यात येत आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कार्यालयाला टाळे ठोको आंदोलन तात्पुरते स्थगित- बाळासाहेब थोरात

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर /प्रतिनिधी/** गंगापूर तालुक्यातील अनेक गावातील जिल्हा परिषद विभागाच्या विविध चालू असलेल्या बांधकामात कोट्यावधींचा घोटाळा झाला असल्याची चर्चा तालुक्याभरात आहे दरम्यान शंकरपूर, गुरुधान-ेरा लासुर स्टेशन जिल्हा परिषद शाळेसह विविध बांधकामाच्या ठेकेदारांना कामे पूर्ण होण्याआधीच एकूण रक्कमेच्या ७० ते ८० टक्के बिले ठेकेदारांना अदा करून त्यांच्या घश्यात करोडो घातले म्हणून दि. ३० मे रोजी भ्रष्टाचार निर्मूलन समितीने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कार्यालयाला टाळे ठोको आंदोलनाचे निवेदन २८ मे रोजी देण्यात आले होते व आज ३० मे रोजी टाळे ठोकण्यात येणार होते मात्र जिल्हा परिषदचे कनिष्ठ अभियंता साहेबराव पाटील यांनी लासुर स्टेशन येथे भेट दिली व त्यांनी जिल्हा परिषदचे उपविभागीय अभियंता यांचे लेखी पत्र आंदोलनकर्ते बाळासाहेब थोरात यांना दिले यां लेखी पत्रात म्हटले आहे की विविध बांधकामाच्या कामाची चौकशी समीती गठीत करण्यात आली असून येणाऱ्या काही दिवस-ात याची पूर्ण चौकशी होऊन लेखी अहवाल देणार असल्याचाही जिल्हा परिषद चे उपविभागीय अभियंता यांनी दिलेल्या लेखी पत्रात दिले आहे.

**गंगापूर तालुक्यातील विविध ठिकाणी जिल्हा परिषद विभागाच्या विविध बांधकामात कोट्यावधी रुपयांचा घोटाळा झाला असल्याचा दावाबाळासाहेब थोरात यांनी केला असून कामे पूर्ण होण्याआधीच एकुण रक्कमेच्या ७० ते ८० टक्के रक्कम ठेकेदाराच्या घश्यात घातला असल्याचेही सांगितले आहे.**

त्यामुळे आंदोलनकर्ते बाळास-ाहेब थोरात यांनी टाळे ठोको आंदोलन तात्पुरते रद्द करण्यात आले व जर पुन्हा कामात सुधारणा झाली नाही तर पुन्हा लोकशाही मार्गाने टाळे ठोकण्याचे आंदोलन पुन्हा करणार असल्याचे बाळासाहेब थोरात यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे.

## अनेक वर्षा पासून बंद पाणंद रस्ता, महसूल व शेतकऱ्यांच्या समंजसपणाने मोकळा

**खुलताबाद/प्रतिनिधी/** खुलताबाद तालुक्यातील मौजे ताजनापूर शिवारात गत अनेक वर्ष पासून बंद पडून असलेला पाणंद रस्ता आखेर महसूल विभाग पोलिस विभाग तथा शेतकरी ग्रामस्थांच्या सहकार्य समंजसपणा मुळे मोकळा करण्यात आला व त्यामुळे शेतकऱ्यांतून आनंद व्यक्त करण्यात येत आहे. खुलताबाद तालुक्यातील मौजे ताजनापूर येथील गेल्या अनेक वर्षापासून बंद असलेला पाणंद रस्ता येथील गट नंबर २२७ ला जाण्यासाठी शेत रस्ता बुधवारी महसूल व पोलीस बंदोबस्त मोकळा करण्यात आला. हा शेतरस्ता परिसरातील सर्व शेतकऱ्यांच्या सामंजस्याने मोकळा करण्यात आला. तहसीलदार स्वरूप कंकाळ खुलताबाद यांच्या आदेशाने व मार्गदर्शन मुळे यांनी सर्व शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन सामंजस्याने पाणंद रस्ता मोकळा केला.

## जिल्हा परिषद उपकरातंर्गत वैयक्तिक लाभाच्या योजना;प्रस्ताव मागविले

**आत्ताच एक्सप्रकस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** जिल्हा परिषदेच्या उपकरांतून मागासवर्गीय घटक व दिव्यांग घटक यांच्यासाठी वैयक्तिक लाभाच्या योजना राबविल्या जातात. त्यासाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी प्रस्ताव मागविण्यात आले आहेत,असे जिल्हा परिषदेचे समाज कल्याण अधिकारी साहेबराव चव्हाण यांनी कळविले आहे.

जिल्हा परिषदेच्या स्व उत्पन्नाच्या किमान २० टक्के रक्कम अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व नवबौद्धांसाठी आणि ५ टक्के दिव्यांगासाठी खर्च करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने जिल्हा परिषद २० % उपकरातून मागासवर्गीयांसाठी व ५ % उपकरातून दिव्यांगांसाठी वैयक्तिक लाभाच्या योजना राबविल्या जातात. त्याकरीता २०२५-२६ या आर्थिक वर्षात पात्र लाभार्थ्यांचे प्रस्ताव दि. १५ जुलै पर्यंत संबंधित पंचायत समिती कार्यालय येथे सादर करावे, असे आ-वाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी साहेबराव चव्हाण यांनी केले आहे.

२० % उपकरातील योज-नेचे नाव मागासवर्गीयाना संगणक, लॅपटॉप पुरविणे, प्रति लाभार्थी अनुदान रु.४२०००/-, मागासवर्गीयांना झेरॉक्स मशीन पुरविणे प्रति लाभार्थी अनुदान रु.४३०७०/-, मागासवर्गीय महिलांना झेरॉक्स मशीन पुरविणे प्रति लाभार्थी अनुदान रु.४३०७०/-, मागासवर्गीयाना कडबा कुट्टी यंत्र पुरविणे प्रति लाभार्थी अनुदान रु.२९०००/-, मागास-वर्गीय महिलांना पिको फॉल शिलाई मशीन पुरविणे प्रति लाभार्थी अनुदान रु.९३००/-, मागासवर्गीय दुग्ध व्यवसायासाठी गाय, म्हैस पुरवठा करीता अर्थसहाय्य देणे प्रति लाभार्थी अनुदान रु.४००००/-, मागासवर्गीयाना मिरची कांडप यंत्र (पल्वालायाजर) पुरविणे प्रति लाभार्थी अनुदान रु. २००००/-, मागासवर्गीयांना शेळी पालनासाठी शे-ळीचे गट पुरविणे प्रति लाभार्थी अनुदान रु.२५०००/-, जि.प.शाळेतील मागासवर्गीय विद्यार्थी, विद्यार्थींनीना सायकल वाटप प्रति लाभार्थी अनुदान रु.३५००/-, मागासवर्गीय इलेक्ट्रिक मोटर संच पुरविणे प्रति लाभार्थी अनुदान रु.२००००/-, मागासवर्गीय शेतकऱ्यांच्या स्प्रिंकलर संच पुरविणे प्रति लाभार्थी अनुदान रु.२१९००/-, मागासवर्गीय लाभार्थ्यांना पिठाची गिरणी पुरविणे प्रति लाभार्थी अनुदान रु.२३५००/- सर्व साधारण अटी व शर्ती अर्जदार हा अनुसूचित जाती (ड.उ.) अनुसूचित जमाती (ड.ढ.) विमुक्त जाती व भटक्या जमाती (त.ग.छ.ढ.) विशेष मागास प्रवर्ग (ड.इ.उ.) व नवबौद्ध या घटकांतील असावा. संगणक योजनेचा अर्जदार १२ वी उत्तीर्ण व एम.एस.सी.आय.टी उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्रधारक असावा. पिको फॉल शिलाई मशीन या योजणेकरीता महिला शिवणकाम करत असल्याचे ग्रामसेवक यांचे प्रमाणपत्र असावे. प्रत्येक योजनेकरीता उत्पन्न प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, तहसिल कार्यालयाचे असावे, ज्या योजनेकरीता विद्युत पुरवठा आवश्यक आहे त्याकरीता विद्युत पुरवठा असल्याचे ग्रामसेवकाचे प्रमाणपत्र असावे, शेती उपयोगी साहित्याकरीता लाभार्थ्याकिउे शेती असल्याचा पुरावा आवश्यक आहे.

५% उपकरातील दिव्यांगासाठीचे योजना

दिव्यांग व्यक्तीना विनाअट घरकुल देण्याची योजना प्रति लाभार्थी देय अनुदान रुपये १ लक्ष २० हजार, निर-ाधार, निराश्रीत अतितीव्र दिव्यांगाना विनाअट निवाई भत्ता, प्रति लाभार्थी देय अनुदान रुपये रुपये १००००/-, अस्थिव्यंग व्यक्तीना स्वंयचलित तीनचाकी सायकल (स्कूटर विथ डाप्शन) डिव्हायसेस फॉर डेली लिव्हींग इ. प्रति लाभार्थी देय अनुदान रुपये १ लक्ष ५०००/-

सर्व साधारण अटी व शर्ती

४० % किंवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्व असल्याबाबतचे युडीआयडी प्रमाणपत्र, तहसिलदार यांनी दिलेले अधिवास, रहिवासी प्रमाणपत्र, यापूर्वी लाभ न घेतल्याचे प्रमाणपत्र, आधार कार्डची झेरॉक्स, घरकुलासाठी ८ अ उतारा, अर्जदार हा ग्रामीण भागा-तील रहिवासी असावा, तहसीलदार यांनी दिलेले वार्षिक उत्पन्न दाखला, स्कुटर विथ डप्शन चालविणेकरीता लाभार्थीकडे परिवहन अधिकारी यांचा परवाना, स्थायी अर्हक प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

# निवडणुका असो अथवा नसो पक्ष संघटन अत्यंत महत्वाचे - अंबादास दानवे

**आत्ताच एक्सप्रकस**

**जालना (प्रतिनिधी)** पक्ष संघटन हे निवडणुका असो अथवा इतर कोणतेही कार्य असो, यासाठी अत्यंत महत्वाचे असते. पक्ष संघटन मजबुत असेल तर आपण सर्व निवडणुका अत्यंत चांगल्या प्रकारे जिंकू शकतो, या करिता सर्वच पदाधिकार्यांनी आपआपल्या क्षेत्रात पक्ष संघटन मजबुत करण्यासाठी प्रयत्न करावेत.

पक्ष संघटन मजबुत करण्यासाठी व नागरिकांना आपला पक्ष सदैव उपयोगी ठरणारा असला पाहिजे. त्यांच्या सुख-दुःखात पदाधिकारी उभा असला पाहिजे तसेच आपल्या क्षेत्रातील नागरिकांच्या अत्यंत छोट्या-छोट्या कामी त्याची मदत केली पाहिजे, असे विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सांगितले.




जालना शहरातील शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या पदाधिकार्यांच्या संघटनात्मक कार्याचा आढावा घेण्यासाठी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर, उपनेते लक्ष्मणराव वडले,उपजिल्हाप्रमुख मुरलीधर शेजुळ,माजी सभापती मुरलीधर थेटे, बाबुराव पवार,तालुकाप्रमुख हरिहर शिंदे, शहरप्रमुख बाला परदेशी, दुर्गेश काठोठीवाले, घनश्याम खाकीवाले, बाजार समितीचे माजी संचालक तुळशीदास काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत हॉटेल मधबुन व हॉटेल अमित येथे पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या कार्याच्या आढावा बैठका घेतल्या. या बैठकीस प्रचंड प्रतिसाद मिळाला.यावेळी पुढे बोलतांना विरोधी पक्षनेते अंबादास दानवे म्हणाले की, आगामी निवडणुका आपल्यातीलच अनेक जण उमेदवार असणार आहेत व भावी लोकप्रतिनिधीही आपल्यातील असतील. या करिता प्रत्येकांनी पक्ष संघटनेचे आवडीने काम करावे, असे आवाहन करत ते म्हणाले की, कोणतेही काम करतांना केवळ पदासाठी स्वार्थासाठी न करता जनसेवेसाठी करावे, असेही दानवे म्हणाले. संघटनेतील प्रत्येक पदाधिकार्यांची जबाबदारी अत्यंत महत्वाची आहे. प्रत्येकाने आपल्या पदाला न्याय दिला पाहिजे. तरच आपण या स्पर्धेत टिकू शकतो. येणार्या निवडणुका हे महत्वाचे उद्दष्टि आहे. ते साध्य करण्यासाठी प्रत्येकांनी झटून काम केले पाहिजे, असेही अंबादास दानवे म्हणाले.यावेळी जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर म्हणाले की, जालना शहरातील दोन्ही बैठकांना उपस्थित पदाधिकारी हे अत्यंत निष्ठावंत व विश्वासू आहेत.पक्षाच्या अत्यंत कठीण काळात हे सर्व पक्षाच्या पाठीशी अत्यंत ताकदीने उभे राहिलेले आहेत.

शहरातील तिनही शहरप्रमुख अत्यंत चांगल्या प्रकारे काम करीत असून संघटन मजबुत करण्याचा कसोसिने प्रयत्न करीत आहेत. उपस्थित असलेल्या सर्व पदाधिकार्यांनी आपआपल्या क्षेत्रातील सर्व बुथप्रमुख, गटप्रमुख, शाखाप्रमुख, विभागप्रमुख, उपविभागप्रमुख या सर्व नियुक्त्या झाल्याची खात्री करावी व आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने आपल्या क्षेत्रातील निवडणुक याद्यांचे वाचन करावे, स्थलांतरीत मतदार, मृत मतदार या सर्व बाबी आवर्जुन पाहाव्यात. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आपणास अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले असून पक्ष संघटना मजबुत होण्यासाठी त्याचा निश्चितच फायदा होणार आहे. कार्यकर्ते व पदाधिकार्यांनी कोणतेही अमिषाला बळी न पडता निष्ठेने पक्षाचे कार्य करावे, असे आवाहनही जिल्हाप्रमुख भास्कराव अंबेकर यांनी केले.यावेळी माजी नगरसेवक संदीप झारखंडे, संदीप नाईकवाडे, सखाराम मिसाळ,जे.के. चव्हाण, विजय शेंदरकर, रविकांत जगधने,राजु खर्डेकर, महादेव कावळे,जान महम्मद कुरेशी, निखील धारेगावकर, घनश्याम कुमठे, नंदुसिंग राजपुत,बजरंग राजपुत, शेख नईम, अनिल अंभोरे, अजय रोडीये, गजानन मगर, जयदेव काळे,दर्शन चौधरी, जय छाबडा, राम जाधव, अशिष बोकण, परमेश्वर घोलप, तुकाराम भुतेकर, सय्यद इम्रान, गणेश लाहोटी, दिपक भालेराव, कुरकण सय्यद, आकाश टेकूर, रमेश तुंगेवार, शुभम गायकवाड, अंकित बाहिती, गोपीकिशन उबाळे,कृष्णा तापडीया, राजु वैद्य, अरुण हिवराळे, तुळजाराम माधवले, चुन्नूसिंग पहेलवान आदींसह मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.दरम्यान यावेळी जालना कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सचिव रजनीकांत इंगळे व जालना येथील शरद पवार यांनी शिवसेनेत यावेळी प्रवेश केला.

## संक्षिप्त

### वकिलावर उपोषणाची वेळ येणे हे दुर्दैवी- बाबा उगले

**धर्मदाय आयुक्त कार्यालयाच्या रस्त्याचा प्रश्न ऐरणीवर**

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** जालना येथील सहधर्मदाय आयुक्त कार्यालयाकडे जाण्यासाठी अद्यापही पक्का रस्ता नाही, ही बाब शासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी ठरत आहे. वारंवार निवेदने देऊनही कारवाई न झाल्यामुळे आता अखेर नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ड. महेश धन्नावत यांनी १ जूनपासून उपोषण करण्याचा निर्णय घेतला. वकिलावर उपोषण करण्याची वेळ यावी, ही दुर्दैवी बाब असल्याची टीका मराठवाडा मुक्ती मोर्चा पक्षाचे अध्यक्ष बाबा उगले यांनी केली आहे.

या संदर्भात दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात बाबा उगले यांनी म्हटले आहे की, ज्याठिकाणी अनुभवी खासदार आणि श्रेष्ठ आमदार सत्तेत आहेत, तिथे वकिलासारख्या सुशिक्षित नागरिकाला रस्त्यासाठी उपोषण करावं लागतं, ही गोष्ट अत्यंत दुर्दैवी आहे, असे ते म्हणाले. उगले यांनी याप्रसंगी हेही स्पष्ट केले की, मराठवाडा स्वतंत्र राज्य झाल्यास अशा समस्यांना नागरिकांना तोंड द्यावे लागणार नाही. विद्यमान राज्य व्यवस्थेमध्ये मराठवाडा दुर्लक्षित राहतो आहे. त्यामुळेच अशा मूलभूत गरजा पूर्ण होत नाहीत. यासोबतच त्यांनी मुख्यमंत्री यांना उद्देशून, जर इतक्या साध्या प्रश्नावरही शासन निष्क्रिय राहणार असेल, तर मुख्यमंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी तीव्र मागणी केली. या मुद्द्यावर आता स्थानिक प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि राज्य सरकार काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ड. महेश धन्नावत यांच्या उपोषणाला काय प्रतिसाद मिळतो आणि शासन त्यावर कोणती कारवाई करते, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

### गुणवंत खेळाडु विद्यार्थ्री यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनीधी** / कला क्रीडा दुत फ ाऊंडेशन महाराष्ट्र, जालना जिल्हा ऑलंम्पीक असोसिएशन व शिशु विहार इंग्लिश स्कुल जालना यांच्य संयुक्त विद्यमाने सन २०२५ मध्ये दहावी व बारावी उत्तीर्ण क्रीडापटु/खेळाडु यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

शालेय शिक्षण पुर्ण करत असतांनांच जे सतत मैदानवर असतात व आपल्या क्रीडा कौशल्याने ज्यांनी शालेय अथवा असोसिएशन द्वारा आयोजीत होणार्या विविध स्पर्धांमध्ये कमीत कमी विभागस्तर किंवा राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रावीण्य किंवा सहभाग नोंदवीला असेल व ज्यांना या वर्षीच्या निकालामध्ये कमीत कमी ८० टक्क्यापेक्षा जास्त गुण असतील असे सर्व खेळाडु मग ते कोणत्याही बोर्डाचे असो या सत्कार सोहळ्याकरीता पात्र असतील.

क्रीडा क्षेत्रातील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवीण्याकरीता तसेच त्यांना प्रोत्साहीत करण्या करीता सदर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. नांव नोंदणी करीता दहवी/बारावीची गुण पत्रीका, खेळाचे प्रमाणपत्र व आधार कार्ड यांची झेरॉक्स पीडीएफ स्वरूपात पाठवावी. तरी जालना जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडु विद्यार्थी यांनी या सत्कार सोहळ्याकरीता १० जुन २०२५ पर्यंत नांव नोंदणी करावी असे आवाहन कला क्रीडा दुत फ ाऊंडेशन महाराष्ट्र, जालना जिल्हा ऑलंम्पीक असोसिएशन व शिशु विहार इंग्लिश स्कुल जालना तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या वतीने करण्यात आले आहे.अधिक माहीतीसाठी शेख चाँद पी.जे. मो.नं. ९८२२४५६३६६ यांच्याशी सकाळी ११ ते संध्या ५ दरम्यान संपर्क साधावा.

# फुलवाडी ग्रामपंचायत घाणीचे साम्राज्य तर घाण पाणी रस्त्यावर

**आताच एक्स्प्रेस**

**कोकाटे हादगाव/ प्रतिनिधी /सोपान वाघमारे** / फुलवाडी गावात मागील अनेक दिवसांपासून संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात आले स्वच्छतेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. तरीही वाढती घाण,अस्वाच्छ पाणी ,सांड पाणी लहान मुलांच्या संडास फुलवाडी गावातील मुख्य रस्त्यावर टाकले जातात विविध ठिकाणी कचऱ्याचे प्रमाण आणि त्यामुळे घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. दरम्यान, प्रसिद्ध देवस्थान मारूती रायाचे मंदिर येथे मुख्य रस्त्यावर घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. याठिकाणी नाल्या तुंबल्यामुळे मुख्य रस्त्यावर पाणी येत आहे.मोठ्याप्रमाणात दुर्गंधी सुटली आहे.यामुळे सातीच्या रोगाने भर धरला आहे. पदार्थव घाणपाण्यामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला असताना याकडे फुलवाडी ग्रामपंचायत ग्रामसेवक हे जाणुनबुजून दुर्लक्ष करीत आहेत.गावातील नागरिकांना या घाण पाण्याचा व दुर्गंधीचा दैनंदिन सामना करावा लागत आहे.या गावातील नागरिकांना या घाण पाणी व घाणेरड्या वस्तू रोडवरच्या बाजूला टाकल्यामुळे गावातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.याला जिम्मेदार कोण राहणार कोण राहणार असा हा मोठा प्रश्न गावतील नागरी चर्चा करीत आहेत.




# जालना महापालिकेत GST अनुदान मंजूर झाल्याबद्दल आनंद

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनीधी** /जालना महानगरपालिकेस शासना मार्फत कायद्यात आवश्यक बदल करून पुढील ५ वर्षा करिता जीएसटी अनुदान ३९२ कोटी मंजूर झाल्यानंतर महापालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांनी फटाके फोडून आनंद व्यक्त करण्यांत आला.



याप्रसंगी आयुक्त तथा प्रशासक श्री संतोष खांडेकर यांनी शासनाकडे पाठपुरावा केला आणि वरिष्ठ लिपीक श्री आंनद मोहीदे व श्री गणेश बत्तीन यांनी ऋढढ प्रस्ताव तयार करण्याकरिता परिश्रम घेतले आहे. त्याबद्दल त्यांच्या सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी मा.आयुक्त तथा प्रशासक श्री संतोष खांडेकर यांनी परभणी आणि लातूर महापालिका याचे पेक्षा जालना महापालिकेस ऋढढ अनुदान जास्त मंजूर झालेले आहे. जालना शहर हे स्टील हब, कृषी उत्पन्न बाजार समिती ही महाराष्ट्रातील एक मोठी बाजारपेठ आहे, शहरातील सीड उद्योग, कपडा मार्केट, लॉजिस्टिक्स पार्क, ड्राय पोर्ट तसेच विविध उद्योग व व्यापाराचे अनुषंगाने शहरातील प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष भरण्यात येणाऱ्या ऋढढ च्या अनुषंगाने सदरील अनुदान कमी मंजूर झालेले असून महापालिकेस जवळपास १२ ते १५ कोटी ऋढढ अनुदान मंजूर होणे अपेक्षित आहे.

यावेळी मुख्यलेखाधिकारी तुकाराम भिसे, मुख्यलेखपरीक्षक प्रविण निंबाळकर, सहाय्यक आयुक्त सुप्रिया चव्हाण, शहर अभियंता सऊद, नगर अभियंता विद्युत कोमल गावंडे,कार्यालय अधीक्षक विजय फुलंब्रीकर, कर अधीक्षक राजेश कुरलीये आणि कार्यालयातील सर्व अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

### हाळीकर प्रकरणी चौकशी करून खुनाचा गुन्हा दाखल करा- वंचित बहुजन आघाडीची मागणी




**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/परतुर तालुक्यातील आष्टी येथे हाळीकर आत्महत्या चा बनाव रचून खुन झाला आहे या प्रकरणी मयताच्या आई वडील व कुटुंबासह वंचित बहुजन आघाडीच्या शिष्टमंडळाने आष्टी पोलिस निरीक्षक यांची दिनांक ३० मे २०२५ रोजी भेट घेतली याप्रकरणी सखोल चौकशी करून दोषींवर खूनाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी शिष्टमंडळाच्या वतीने करण्यात आली यावेळी वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष दिपक डोके , जिल्हा कार्याध्यक्ष प्रमेश्वर खरात, रामप्रसाद थोरात,चौखाजी सौंदर्य,युवा जिल्हा उपाध्यक्ष हरीष रत्नपारखे,सम्यक विद्यार्थी आंदोलन जिल्हाध्यक्ष सुरज सोनोवने , तालुकाध्यक्ष समाधान तोडके, नितीन तायडे ,प्रभु दाभाडे ,अझर शेख यांच्या सह प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# परतुर येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती निमित्त महिला सन्मान पुरस्कार वितरण सोहळा सम्पन्न

**आताच एक्स्प्रेस**

**आष्टी /प्रतिनिधी/सोपान वाघमारे** / महाराष्ट्राच्या इतिहासात अनेक थोर व्यक्तिमत्त्वांनी आपल्या कार्याने आणि विचारांनी समाजाला प्रेरणा दिली आहे. त्यापैकी एक म्हणजे पुण्यश्लोक लोकमाता अहिल्याबाई होळकर होत्या. अठराव्या शतकात पुरुषप्रधान समाजात स्वतःच्या बुद्धिमत्तेने, धैर्याने आणि प्रजाहितदक्षतेने माळवा प्रांतावर राज्य करणाऱ्या अहिल्याबाईंनी नारीशक्तीचा आदर्श घालून दिला. अहिल्याबाईंनी निष्पक्ष आणि प्रजाहितदक्ष प्रशासन प्रस्थापित केले. गावोगावी पंच नेमून त्वरित न्यायदानाची व्यवस्था केली. करप्रणाली सौम्य करून शेतकऱ्यांना दिलासा दिला. असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी केले.डोंगरी भागातील भिल्ल आणि गोंड आदिवासींना कर वसुलीचा अधिकार देऊन त्यांच्याशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित केले. त्यांनी स्वतःच्या मुलाला रथाखाली वासराला चिरडल्याबद्दल शिक्षा ठोठावली, ज्यामुळे त्यांच्या न्यायनिष्ठेची ख्याती पसरली. पुण्यश्लोक लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त आज दिनांक २९ रोजी परतूर येथील गजानन मंगल कार्यालयात महिला सन्मान पुरस्कार वितरण सोहळा २०२५ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद जालना आणि पंचायत समिती परतूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या सोहळ्याने अहिल्यादेवींच्या प्रेरणादायी कार्याचा गौरव करताना आमदार बबनराव लोणीकर बोलत होते. आ. बबनराव लोणीकर यांच्या शुभहस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी श्रीकृष्णनाथ पांचाळ, उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड तहसीलदार श्रीमती प्रतिभा गोरे गटविकास अधिकारी राजेश तांगडे, महिला व बालविकास प्रकल्पाधिकारी रमेश कोळेकर भाजपा तालुका अध्यक्ष शत्रुघ्न कणसे , रमेश भापकर संपत टकले अशोकराव बरकुले , बद्रीनारायण ढवळे प्रवीण सातोनकर यांची प्रमुख उपस्थिती होती.




कार्यक्रमात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या माळवा प्रांतातील प्रजाहितदक्ष आणि निष्पक्ष प्रशासनाचा गौरव करण्यात आला. त्यांनी राबवलेली निःपक्षपाती न्यायव्यवस्था, शेतकऱ्यांसाठी सौम्य करप्रणाली, आणि भिल्ल-गोंड आदिवासींशी मैत्रीपूर्ण संबंध यांचे स्मरण करण्यात आले. त्यांनी विहिरी, तलाव, घाट, रस्ते, धर्मशाळा आणि मंदिरांचे बांधकाम करून सामाजिक आणि पर्यावरणीय विकासाला चालना दिली. सती प्रथेला विरोध, महिलांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण आणि सर्वधर्मसमभावाच्या विचारांनी त्यांनी सामाजिक समतेचा आदर्श घालून दिला. महेश्वर येथील विणकर आणि कारागिरांना प्रोत्साहन देऊन त्यांनी उद्योगाला चालना दिली.

### राज्यभर तंबाखू प्रतिबंध उपक्रम

**मुंबई/ प्रतिनिधी/** जागतिक तंबाखू मुक्ती दिनानिमित्त सामाजिक न्याय विभागाअंतर्गत कार्यरत नशाबंदी मंडळामार्फत राज्यभर तंबाखू प्रतिबंध उपक्रम राबविण्यात येत आहे. तंबाखूच्या अतिसेवनामुळे होणाऱ्या गंभीर आजारांविषयी जनजागृती करत लोकांना नशा मुक्त जीवन जगण्याचे आवाहन या उपक्रमात करण्यात आले.या उपक्रमाचे उद्घाटन आरोग्य विभागाचे सचिव निपुण विनायक यांच्या हस्ते मंत्रालयात करण्यात आले. मुंबईतील केईएम रुग्णालय, सायन रुग्णालय व सेंट जॉर्ज रुग्णालयातील डॉक्टरांच्या उपस्थितीत नागरिकांना तंबाखू व इतर व्यसनांच्या दुष्परिणामांविषयी सखोल माहिती देण्यात आली.

### राष्ट्रमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ३०० व्या जयंतीनिमित्त मॅरेथॉन व वॉकोथॉन स्पर्धा : जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे

जालना /प्रतिनिधी / राष्ट्रमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त जालना शहरात भव्य मॅरेथॉन व वॉकोथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा दिनांक ३१ मे २०२५, शनिवार रोजी सकाळी ६.०० वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, जालना येथून सुरुवात होईल.स्पर्धेचा मार्ग छत्रपती शिवाी महाराज पुतळा फ राजमाता जिजाऊ प्रवेशव्दार फ झाशीची राणी लक्ष्मीबाई चौक फ मशीन हॉस्पीटल फ राम मंदिर फ छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे स्पर्धेचा समारोप होणार आहे.

या मॅरेथॉन व वॉकोथॉन स्पर्धेत महिला स्पर्धकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अँण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813